International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# भटक्या विमुक्तांचे साहित्य

**मयुरी संतोष जाधव[1], डॉ. वंदना विनायक नढे[2]**

*[1]विद्यार्थी, एस. एम. जोशी कॉलेज, माळवाडी, हडपसर, पुणे - ४११०२८*

*[2]मार्गदर्शक, मराठी विभाग प्रमुख, श्री शिव छत्रपती कॉलेज,जुन्नर ता.जुन्नर ,जि.पुणे*

*Corresponding Author – मयुरी संतोष जाधव*

**DOI - 10.5281/zenodo.18654411**

**भटके विमुक्तांचे साहित्य:**

महाराष्ट्रातील भटके व विमुक्त समाज हा सामाजिक रचनेतील सर्वात जास्त वंचित, अपेक्षित आणि अन्यायग्रस्त घटक मानला जातो. इतिहासाच्या ओघात या समाजावर अनेकदा अन्याय झाला आहे. ब्रिटिशकालीन सत्ताधार्यांनी १८७१ मध्ये *क्रिमिनल ट्राईब ॲक्ट* लागू करून अनेक जमातींना "जन्मजात गुन्हेगार" ठरवले. या कायद्यामुळे समाजातील सर्वसामान्य लोकांमध्ये या जमाती बाबत अविश्वासाची आणि भीतीची भावना निर्माण झाली. परिणामी, त्यांना मुख्य प्रवाहातील शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रापासून जाणीवपूर्वक दूर ठेवण्यात आले. भटके-विमुक्त समाजात विविध जाती-जमातींचा समावेश होतो. त्यात बेरड,रामोशी, वडार, वाघरी, गारुडी, गोंधळी, कोल्हाटी आणि नंदीवाले यांसारख्या जमाती प्रमुख आहेत. यांची पारंपारिक जीवनशैली ही भटकंती स्वरूपाची असल्याने त्यांचे आयुष्य सतत स्थलांतरित राहिले आहे. गावोगावी जाऊन लोककला, नृत्य-गायन,कसरती, देवीची जत्रा, गोंधळ घालणे, प्राण्यांचे खेळ दाखवणे अशा विविध माध्यमातून त्यांनी समाजाचे मनोरंजन केले, तसेच त्यांच्याशी निगडित व्यवसायावर आपला उदरनिर्वाह चालवला. या समुदायाकडे अनेक अद्वितीय कौशल्य आणि सांस्कृतिक वारसा आहे, ज्यामुळे भारतीय लोकसंस्कृती अधिक वैविध्यपूर्ण बनली आहे.

भटक्या-विमुक्तांचे समग्र वाङमय आत्मचरित्रे लोककथा लोकगीत त्यांचा प्रसिद्ध केलेला जाहीरनामा त्यांच्या अंतरंग जाती आणि जमातींची संकलित माहिती पालावरचे जग इत्यादी भिक मागणाऱ्या काही जाती सोडल्यास भटक्या-मुक्तांची वाङ्मय म्हणजे श्रमजीवी वर्गाची वाङ्मय १९८० मध्ये प्रसिद्ध झालेल्या लक्ष्मण मानेंच्या उपरा आत्मचरित्रापासून त्यांच्या वाङ्मयाचा उगम होऊन मराठी वाङ्मयात मिळाला.

मराठी साहित्याने या समाजाच्या जीवनातील संघर्ष, स्वप्ने, आणि अन्यायग्रस्त वास्तव यांना अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला भटके-विमुक्त समाजावर आधारित साहित्यिक लेखन अधिक ठळकपणे समोर आले. आत्मकथनात्मक साहित्य हा त्याचा सर्वात महत्वाचा पैलू आहे.

भटक्या-विमुक्तांच्या साहित्याचे प्रामुख्याने दोन स्तर दिसतात-एक आहे 'परंपरेने जपलेल्या लोकसाहित्याचा' आणि दुसरा आहे, 'आत्मचरित्रांचा' त्यावेळी जाणवले की, हा समाज महाराष्ट्रीयन समाज जीवनाच्या तळागाळाचा एक स्तर आहे. त्यांच्या अशा काही विचारधारा आहेत त्यातून त्यांचे असे एक वेगळे

सांस्कृतिक जीवन उभारून आले आहे. परंपरा जपत जपत तो आपल्या सामाजिक अस्तित्वाला आणि भावबंधांना शब्द सामर्थ्यांना व्यक्त करण्याचा प्रयत्न करत असतो.

**लोकसाहित्य :**

जन्मापासून मृत्यूपर्यंतचे जीवन, संस्कार,सण-उत्सव,यात्रा-जत्रा, कला-क्रीडा, देवधर्म, लोकांच्या भावभावना, इच्छा-आकांक्षा, सुख-दुःख, श्रद्धा, धारणा, राग-द्वेष, आचार-विचार अनावृत्त स्वरूपात लोकजीवनाच्या सर्वांगाशी ज्या साहित्याचा संबंध येतो त्याला 'लोकसाहित्य' म्हणतात. यांच्या लोकसाहित्याचा शोध घेतल्यास लोककथा व लोकगीत एवढीच त्यांच्या लोकसाहित्याची मर्यादा असल्याचे दिसून येते म्हणून लोककथा व लोकगीत याचा स्वतंत्र विचार मांडला आहे.

**आत्मचरित्रात्मक *वाङ्मय*:**

**"उपरा":**

महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जमातींपैकी "कैकाडी" या विमुक्त जाती जन्मलेल्या लक्ष्मण माने यांचे "उपरा" हे मराठी साहित्यात गाजलेल्या आत्मचरित्र आहे जगाच्या पाठीवर ज्या समाजाला व्यक्तीला स्वतःचे वतन नाही त्या समाजाला व्यक्तीला "उपरा" असे म्हणतात.

"उपरा" हे पुस्तक सहज चालले तर, बऱ्याच गोष्टी आपल्याला लक्षात येतात. समाज व्यवस्थेतील प्रत्येक जातीचे कंगोरे ठरलेले आहेत त्यात कैकाडी म्हटलं की, गावदरीत एखाद्या झाडाखाली फोकाच्या जुडीने झाडून पाठीवरचे बिऱ्हाड निवाऱ्याला टेकविणार. अशा लोकांना एक गावातला धंदा संपला म्हणजे दुसरं गाव शोधावं लागतं. "आज इथं तर उद्या तिथं" असं निराधार फिरावं लागत. पोटासाठी भटकंती करून असंख्य कणगी-टोपल्यांना गुड बसवण्याचा व्यवसाय करावा लागतो. अनेकांच्या कणगी टोपल्यांना बुड बसविणाऱ्या समाजाला बिनबुडाचे जीवन जगावं लागतं, हीच लेखकाच्या मनातील जीव जाळणारी खंत आहे. असे असले तरी लेखक समाजव्यवस्थेच्या नावाने बोटं मोडत बसलेला दिसत नाही. अनंत अडचणींशी टक्कर देऊन, मित्रांच्या साहाय्याने शिक्षण घेणे हा त्याच्या मनाचा संकल्प वाटतो. तो पूर्ण केला तरच जीवनाच्या पायवाटेचे रूपांतर महामार्गात होईल हे त्याचे स्वप्न दारिद्र्याच्या व अंधश्रद्धेच्या चिखलात फसलेले आईवडील,उदार अंतकरणाचे मित्र, जातीवादाचा जुनाट वटवृक्ष खणून काढायला निघालेले प्राध्यापक हेच लेखकाच्या स्वप्नपूर्तीचे खरे आधारस्तंभ मानावे लागतात .

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे, लेखकाजवळ असलेली वादय कला ही त्याच्या समाजाचे सांस्कृतिक अंग होय. वाद्य कलेची जोपासना करीत असताना अनेक वेळा अस्पृश्यतेचे चटके बसले आहेत. पण त्याच्याकडे त्यांना नाईलाजाने दुर्लक्ष करावे लागले.

जीवनातील प्रसंग सफाईने सांगण्याची पद्धत, छोटी वाक्य, उगवती भाषाशैली, काव्यमयता, निसर्गवर्णन, स्वतःच्या भाषेतील शब्दांची केलेली पेरणी. उदा. उरसांड,गिरवी ठेवणे इत्यादी. तसेच "उपरा" चे परकीय भाषात झालेले भाषांतर अशा साहित्यिक वैशिष्ट्यामुळे हे पुस्तक साहित्य पुरस्काराचे मानकरी ठरले आहे.

**'उचल्या':**

अल्पावधीतच प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचलेले "उचल्या" हे आत्मचरित्र पाथ्रुडाच्या लक्ष्मण गायकवाडचं आहे. हुलकावण्या देऊन, व्यक्तीच्या गहाळपणाचा फायदा घेऊन चोरी करणाऱ्याला "उचल्या" असे म्हणतात.

लेखकाच्या समाजाचा, घराण्याचा, चोऱ्या करणे हा स्थायिभाव. पण तो स्थायिभाव 'उचल्या'कार सहजपणे झटकून टाकतो. उचल्या वाचताना समाजात

अंधश्रद्धेने चांगलेच मूळ धरल्याचे लक्षात येते. चोरी करायला जाताना भारत पत्ती बरोबर नेतात चोरी साधावी म्हणून तिला रक्ताचा टिळा लावला जातो. तसेच त्यांचा जातपंचायतीचे नियम अशोभनीय वाटतात पण अनैतिकतेला चोख उत्तर देणारी व नैतिकतेची पोषण करणारी न्यायसंस्था म्हणून तिचा गौरव केला तर ते वावगे ठरणार नाही,

कमालीचे दारिद्र्य असूनही जुजबी शिक्षण घेऊन समाजकार्याला वाहून घेणे, राजकारणात पडणे, निवडणुकीत अपयश आले तरी खचून न जाता अतूट आत्मविश्वासाने पुन्हा उभे राहणे, लेखकाचे हे गुण अनुकरणीय आहेत.

मराठी साहित्यात एक सांकेतिक कोंडी निर्माण झाली होती. मोठ मोठे साहित्यिक त्या कोंडीत गुरफुटून गेले होते. चाकोरीबद्ध वाङमयनिर्मिती शिवाय दूसरा मार्ग दिसत नव्हता. "उचल्याने" सांकेतिक कोंडी फोडून वास्तवतेचे दर्शन घडविले. जगल्या जीवनाचा सत्यार्थ स्वतःच्या भाषेत मांडल्याने साहित्यकृती कशी कसयुक्त व दमदार बनते हे "उचल्याने" साहित्यिकांना सोदाहरण पटवून दिले. यातच त्याचा साहित्य-पुरस्काराचे गमक दडले आहे . "उचल्याचा गौरव" हा भटक्या-विमुक्तांच्या साहित्याचा विजय व सत्तेचा आणि समाजव्यवस्थेचा पराभव म्हणावा लागेल.

**"बेरड":**

"बेरड" शब्द उच्चारल्याबरोबर लोकांच्या मनात भीती निर्माण होते. चोर,दरोडेखोर, लुटारु अशी प्रतिमा मनात उमटते. अशा बेरड समाजात जन्मलेल्या भीमराव वस्तीचे "बेरड" हे आत्मचरित्र आहे.साहित्यिक निकषांच्या दृष्टीने "बेरड" पुस्तकाचा विचार केला समाजचित्रण अधिक दिसते. बोर्डिंग मध्ये राहून लेखक शिक्षण घेत असताना दिवा भिजवणे अशा काही मोजक्या प्रसंगातून लालित्य अभावानेच आढळते. या पुस्तकाला दहा हजार रुपयांचा पुरस्कार मिळाला. त्याचे कारण लेखक भीमराव वस्ती "बेरड" समाजाचे वास्तववादी दर्शन घडविण्यात यशस्वी झाल्याचे बक्षीस वाटते.

**"गबाळ":**

महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जमाती पैकी कुडमुडे जोशी समाजात जन्मलेल्या दादासाहेब मोरे यांचे "गबाळ" हे आत्मचरित्र आहे. दिशाहीन गलबत्ताप्रमाणे देशात,राज्यात भीक मागून पोट भरण्याच्या निमित्ताने चार-सहा पालांच्या संख्येने पोट पाठीला बांधून कुडमुडे जोशी समाज सतत भटकतो. भटकताना घोडयावर "गबाळ" बांधलेलं असतं. ते " गबाळ" म्हणजे संसार होय.

भटकंतीत गावातील प्रत्येक घरासमोर उभे राहायचं आणि म्हणायचं, तुझ्या घरी सुख निर्माण करतो, तुझ्या संपत्तीत बरकत आणतो, तुझ्या मुलांनी तुझं ऐकावं असं करतो, घरातील भांडण मिटवितो. माझ्या म्हणण्याप्रमाणे केलं तर 'जय चालतया, या लक्ष्मी पावतीया, यश मिळतया, पण त्यासाठी जीवदान म्हणून एक कोंबडी पाहिजे.' असं खोटनाटं सांगून भीक मागणे हा लेखकाच्या समाजाचा व त्याच्या घराण्याचा व्यवसाय आहे. सततच्या भटकंतीत शिक्षण पूर्ण करून समाजाची सुख-दुःख, अवहेलना, छळ, अपमान तसेच 'काकडीची चोरी आणि फाशीची शिक्षा' अशा सामाजिक अन्यायावर मात करण्यात त्याला यश मिळाल्याचे सिद्ध होते.

लेखकाला नाटकाची गोडी असल्यामुळे महाविद्यालयात 'इच्छा माझी पुरी करा' हे नाटक बसवले. तेव्हा त्यात केलेली भूमिका, या सर्व प्रसंगावरून 'गबाळला' संस्कृतिक दर्जा प्राप्त झालेला आहे. हे लक्षात येते. भटक्या-विमुक्तांच्या साहित्याचे दालन समृद्ध करण्यासाठी लेखकाने लावलेला हातभार मोलाचा वाटतो. त्याची पहिली साहित्य कृती म्हणून कौतुक करावे तेवढे अपुरेच वाटते.

**भटके-विमुक्तांचे समग्र *वाङ्मय* :**

भटकया-विमुक्तांचे समग्र *वाङ्मय*,आत्मचरित्रे, लोककथा, लोकगीत त्यांचा प्रसिद्ध केलेला जाहीरनामा, त्यांचे अंतरंग जाती आणि जमातीची संकलित माहिती, पालावरच जग इत्यादी. भीक मागणाऱ्या काही जाती सोडल्यास भटक्या-विमुक्तांचे *वाङ्मय* म्हणजे श्रमजीवी वर्गाचे *वाङ्मय* होय.

कटू पण सत्य अशा वास्तवतेचे दर्शन भटके-विमुक्तांच्या वाङ्मयातून घडते. त्यासाठी व्यथा,वेदना, छळ, अन्याय यांच्या समर्थनार्थ संदर्भाच्या उतरंडी रचण्यात स्वारस्य वाटत नाही कारण "सगळया घटना वास्तवादी आहेत, तशा घडलेल्याही आहेत." तरीही त्यांच्या जखमा कुणी पुसल्या नाहीत. वेदनांच्या शमनार्थ कुणा सुबुद्धाने फुंकर घातल्याचे दिसत नाही. उघडे-बोडके आयुष्य झाकण्यासाठी कुणाच्याही मदतीचे हात अजून पुढे येताना दिसत नाहीत. त्यांच्या वाहणाऱ्या अश्रूंना बांध घालणे, इतर लोक स्वतःला कमी समजतात.

त्यांच्यात शब्दात सांगायचे तर त्यांचा समाज वर्णव्यवस्था व समाजव्यवस्था या दोन्ही व्यवस्थांनी उघडपणे नाकारलेला. त्या जाती-जमातींवर इंग्रजांनी गुन्हेगारीचा शिक्का मारला आणि गुन्हेगारीच्या जीवघेणा दुष्टचक्रात त्यांच्या आयुष्य कैद झाले. उपजीविकेचे कोणतेही साधन व्यवस्थेने न ठेवल्यामुळे केवळ गुन्हेगारी करून पोट भरण्याचा एकमेव मार्ग त्यांना खुला राहिला. अज्ञान, दारिद्र्य, उपासमार पाचवीला पुजलेली आणि त्यात मिसळलेले अत्याचाराचे व गुन्हेगारीचे जिणे.

भटकया-विमुक्तांच्या वाङ्मयकृतीचे सामर्थ्य अनेक गोष्टींमधून दिसून येते.समाजवादी वाङमय प्रवाहातील कसदार कृती म्हणून त्यांच्या आत्मचरित्रात्मक साहित्याची नोंद घ्यावी लागेल. भटक्या-विमुक्तांच्या सुशिक्षित तरुणांनी लिहिलेल्या आत्मचरित्राचे खास वेगळेपण म्हणजे त्यांच्यामधून चित्रित केलेले समाजजीवन.

**भटक्या -विमुक्तांच्या साहित्याची भाषा :**

व्यक्तीच्या मनातील विचार व्यक्त करण्याचे साधन म्हणजे भाषा पण भटक्या-विमुक्तांच्या भाषेचा विचार केला तेव्हा असं लक्षात आलं की कोणत्याही भटक्या-विमुक्तांची भाषा एक नसून त्यांच्यात भाषाभिन्नत्व आहे, हे कुणालाही नाकारता येत नाही.

कैकाड्यांची भाषा वैदुला कळत नाही. वैदुची भाषा कोल्हाट्याला समजत नाही, तर रामोशी- बेरडांची जी सांकेतिक भाषा आहे, ती पोतराज, धनगर लोकांना समजत नाही. भटकया-विमुक्तांच्या भाषेला लिपी नाही. त्यामुळे ती अलिखित आहे. बोली भाषा म्हणून तया तया समाजाकडून पिढ्या न पिढ्या आज तागायत जीवंत राहिली आहे. बऱ्याच समाजात त्यांच्या बोलीभाषेशिवाय बोलताना हिंदी भाषेचा वापर केला जातो. पण त्यांची बोलण्याची ढब वेगळी आहे. अनुभवाधारीत व वास्तववादी भाषा, साहित्यिक अलंकारापेक्षा आशयाला महत्व, लोकसंस्कृतीचा प्रभाव स्वत्व जपणारी भाषा,थोडक्यात सांगायचे तर भटक्या-विमुक्त साहित्याची भाषा ही संघर्षाची,वेदनेची आणि आत्मअभिव्यक्तीची भाषा आहे.

**भटक्या-विमुक्तांच्या *वाङ्मयाचे* साहित्यिक महत्त्व :**

'उपरा' या आत्मकथनामुळे भटक्या-विमुक्त साहित्य प्रवाहाला मुख्य प्रवाहात मान्यता मिळाली. भटक्या-विमुक्त आत्मकथनांनी वाचकांमध्ये सहानुभूती निर्माण करून त्यांना सामाजिक विषमते विषयी विचार करायला भाग पाडले.सामाजिक जाणीव निर्माण करण्यात या आत्मकथनांचा मोठा वाटा आहे. भटक्या-विमुक्त समाजातील तरुण पिढीला आत्मसन्मानासाठी उभे

राहण्याची प्रेरणा दिली.वाचक समाजात या समुदयाबद्दल संवेदनशीलता निर्माण झाली.

**भटक्या-विमुक्तांच्या साहित्याची वैशिष्ट्ये:**

आत्मचरित्रात्मक स्वरूप असूनही एका व्यक्तीच्या मर्यादित जीवन कथेपलीकडे जाऊन संपूर्ण समाजाचे वास्तव उलगडते. यात लेखकांच्या वैयक्तिक वेदना आणि संघर्ष समाजाच्या सामूहिक वेदना व सामूहिक लढाईशी जोडलेले दिसतात. त्यांची आत्मकथने हे केवळ वैयक्तिक न राहता समाजाच्या दुःखाचे आरसे ठरले आहेत.यातून भटक्या समाजाचा सांस्कृतिक वारसा,कला, लोकनाट्य आणि सामाजिक उपेक्षा एकत्रितपणे दिसून येतात.

**निष्कर्ष:**

भटक्या-विमुक्तांच्या साहित्य विश्वाचा आढावा घेतला असता, एक बाब विशेषता जाणवते ती म्हणजे भटक्या-विमुकतांची परिस्थिती जरी गंभीर असली तरी मनस्थिती फार खंबीर आहे आणि त्यातूनच त्यांनी जीवनातील संघर्षाला कसे सामोरे जायचे याचा मोठा आदर्श समाजापुढे ठेवला आहे.भटक्या-विमुक्तांची *वाङ्मय* कृती म्हणजे अत्याचाराच्या वरवंट्याखाली भरडून निघालेल्या आत्मभानाचा दाहक आणि आक्रमक हुंकार आहे म्हणूनच भटक्या-विमुक्तांचे *वाङ्मय* म्हणजे मुळापासून हादरवून टाकणारं एक वास्तव होय.

**संदर्भ :**


1. उपरा (आत्मकथन ) - लक्ष्मण माने, चौथी आवृत्ती १९८८ या मुक्कामावरून (मनोगत) ग्रंथाली, मुंबई.
2. महाराष्ट्रातील भटका समाज : संस्कृती व साहित्य - डॉ. नागनाथ धों कदम,प्रतिमा प्रकाशन, पुणे 2013.
3. उचल्या (आत्मकथन) - लक्ष्मण गायकवाड, श्री विद्या प्रकाशन, पुणे.
4. बेरड, भीमराव वस्ती - पारधी प्रकाशन, बेळगाव.
5. गबाळ - दादासाहेब मोरे, श्री विद्या प्रकाशन, पुणे, 1990.
6. भटक्या विमुक्तांची जातपंचायत - रामनाथ चव्हाण, देशमुख आणि कंपनी पुणे.